# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उदयान/२२ /२०२५-२६ दिनांक :- ०९/०४/२०२५

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- मनपाच्या संकेतस्थळावर वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीचा खुलासा प्रसिध्दी करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे "माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षणाच्या जनजागृतीसाठी किल्ला सायक्लोथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असुन सदर सायक्लोथॉनच्या ढिसाळ नियोजनाची परंपरा कायम याबाबत दि.08/04/2025 रोजीच्या दै.महाराष्ट्र टाईम्स या वृतपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीबाबत सोबत जोडलेला खुलासा मनपाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी करण्यात यावा

सोबत:- खुलासाची प्रत .

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\2025-26\LETTER ALL\LETTER

Scanned with OKEN Scanner

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे "माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षणाच्या जनजागृतीसाठी किल्ला सायक्लोथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असुन सदर सायक्लोथॉनच्या ढिसाळ नियोजनाची परंपरा कायम याबाबत दि.08/04/2025 रोजीच्या दै.महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीबाबत वस्तुस्थिती खालिलप्रमाणे आहे.

मिरा भाईदर महानगरपालिकेतर्फे "माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण जनजागृतीसाठी दि.04/04/2025 ते दि.06/04/2025 रोजी पर्यंत वसुंधरा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दि.04/04/2025 रोजी मा. आयुक्त यांच्या उपस्थितीत वृक्षदिंडी काढत वसुंधरा महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. या महोत्सवात पर्यावरण व संस्कृती संवर्धनासाठी विविध प्रकारचे भव्य विक्री प्रदर्शन आयोजन करण्यात आले. दि.05/04/2025 सकाळी चित्रकला स्पर्धेदरम्यान महानगरपालिका आणि खाजगी शाळेतील अंदाजे १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सायंकाळी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणाशी निगडीत आयोजित केलेल्या "वसुंधरा महोत्सव २०२५" या उपक्रमाचे व पर्यावरण संवर्धनासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम महापालिकेच्या माध्यमातून सतत राबवत येत असल्याने मा. ना. श्री. प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य, माजी आमदार, सिने अभिनेत्री/अभिनेता यांनी मिरा भाईंदर महापालिकाचे अभिनंदन व कौतुक केले. रविवार दि.06/04/2025 रोजी किल्ला सायक्लोथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असुन 366 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.), ज्येष्ठ मराठी अभिनेता अरुण नलावडे, यांच्या हस्ते पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

दि.०६/०४/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या किल्ला सायक्लोथॉन या स्पर्धेसाठी पुर्वतयारी म्हणून दि.01/04/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता अतिरीक्त आयुक्त यांनी वाहतूक विभाग यांच्यासहित सार्व. बांधकाम विभाग, सार्व आरोग्य विभाग यांची बैठक घेऊन सदर स्पर्धा सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक त्या खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

1) किल्ला सायक्लोथॉन मार्गामध्ये volunteers उभे करणे, दिशा दर्शक बोर्ड लावणे, पाण्याची व्यवस्था करणे 2) वैद्यकीय आरोग्य विभाग - किल्ला सायक्लोथॉन करीता रुग्णवाहिका व प्रथमोपचार किटसह आरोग्य परिचारीका यांची नेमणुक करणे 3)सार्वजनिक बांधकाम विभाग - किल्ला सायक्लोथॉन मार्गाची पाहणी करुन रस्त्यावरील खड्डे बुजवणे 4) वाहतुक शाखा काशिमीरा - रस्त्यावरील उभी असलेली बेवारस वाहने व पार्किंग केलेली वाहणे उचलणे व स्पर्धेच्या दिवशी वाहतुकीवर नियत्रंण करणेबाबत आदेशित केले. त्यानुसार सर्व विभागांनी स्पर्धेच्या दिवशी सर्व संबंधित गोष्टींचे नियोजन केले.

सायक्लोथॉन स्पर्धा सुरु होण्याच्या आगोदर जंजिरे किल्ल्याजवळ उतार असल्याने स्पर्धकांनी सायकलवरुन उतरुन चढण चढणे व उतरणेबाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या. स्वयंसेवक व ट्राफिक पोलिस जागोजागी उभे होते. सदर स्पर्धेच्यावेळी सुचनांचे पालन न केल्याने व उताराचा अंदाज न आल्याने एक स्पर्धक पडून जखमी झाले आहेत. या घटनेची दखल मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी तात्काळ घेतली. मा. आयुक्त तथा प्रशासक हे घटनास्थळी स्वतः जखमी स्पर्धकासोबत होते व जखमीं स्पर्धकास रुग्णवाहिकेत बसवून त्वरीत रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार करण्याच्या सुचना उपस्थित डॉक्टर व परिचारीका यांना दिल्या व त्यांच्या प्रकृतीची सातत्याने आढावा घेत संवेदनशीलता दाखवली. जखमींवर भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात उपचार करण्यात आले. सदरची घटना दुर्दैवी असून सदर घटनेप्रती मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन संवेदनशील आहे. तसेच अशा प्रकारची घटना पुढे घडणार नाही याबाबत संपूर्ण दक्षता घेण्याबाबत मनपा मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी सूचना दिल्या आहेत.

सदर वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीची वस्तुस्थिती वरीलप्रमाणे आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner















Scanned with OKEN Scanner